<u>प्रकरण पहिले</u>

# कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर : परिचय

१) प्रास्ताविक

२) भारतातील कृषी बाजार नियंत्रणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

३) महाराष्ट्रातील बाजारसमितींचा आढावा

४) कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीची पार्श्वभूमी व परिचय

## १. प्रास्ताविक:

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्या देशातील मुख्य व्यवसाय शेती असून , सुमारे ७०% लोकं या व्यवसायावर अवलंबून आहेत. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतातील शेती प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असल्याने त्याचा परिणाम शेती उत्पादनाबरोबरच मागणी व पुरवठ्यावर होतो. त्यामुळे बाजारपेठेचे स्वरूप बदलते. ग्रामीण भारताचा व शेतीचा विकास करावयाचा असेल तर अनुषंगिक सोयी सुविधा व संरचनेचा विकास होणे आवश्यक आहे . शेती विकास होवून वाढत्या लोकसंख्येला व औद्योगिक विकासाला शेतीउत्पादनाचा योग्य पुरवठा व्हावा यासाठी शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळणे आवश्यक आहे. यासाठी देशात बाजारपेठांची निर्मिती झाली आहे.

भारतासारख्या प्रामुख्याने कृषिव्यवसायावर आधारभूत असलेल्या देशात कृषि उत्पादनाच्या विक्रयव्यवस्थेचे फार मोलाचे स्थान आहे. शेतीमालाला निश्चित व योग्य किंमत कशी मिळेल यावर शेतीचे भवितव्य व पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. शेतकरी हा शेती व्यवसायाचा मुख्य सुत्रधार असून त्याच्या आर्थिक विकासावर, देशाचा विकास व स्थैर्य अवलंबून असल्याने शेतकऱ्याला शेती उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. शेती व्यवसाय योग्य प्रमाणात फायदेशीर होवू लागला तरच शेतकऱ्याचा उत्साह वाढेल, तो अधिक मेहनतीने, जिद्दीने, दक्षतेने व आधुनिक पध्दतीने शेती उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करील. त्यामुळे शेती उत्पादन वाढीबरोबरच राष्ट्रीय उत्पादनात वाढ होईल. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थीती सुधारण्यास मदत होईल. शेती उत्पादन वाढीमुळे उद्योगधंदे व कारखानदारीत वाढ होवून रोजगार निर्मितीत सुध्दा वाढ होईल. एकंदरीत शेती व्यवसायाच्या प्रगतीमुळे देशाची आर्थिक उन्नती व विकास घडून येईल.

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ही केवळ शेतीतूनच मिळणाऱ्या उत्पादनाच्या परिणामावरच अवलंबून नसते तर त्याने उत्पादीत केलेल्या शेतीमालाला बाजारपेठेत किती किंमत मिळते यावर अधिक अवलंबून आहे. शेतमालाचे उत्पादन वाढवून सुध्दा बाजारात शेतीमालाला योग्य किंमत मिळत नसेल तर शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारणे कदापिही शक्य नाही. स्वातंत्र्यानंतरच्या ५७ वर्षात देशाची लोकसंख्या चार पटीने वाढलेली आहे. आपला देश मध्यंतरीच्या काळामध्ये अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत कमालीचा परावलंबी होता. तथापि भारतीय शेतकऱ्यांच्या श्रमातून शेतीउत्पादनात व धान्यात भरमसाठ वाढ झाल्याने लोकसंख्येमध्ये झालेल्या चारपट वाढीच्या

पार्श्वभूमीवर देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला. देशाला स्वाभिमानाने जगण्याइतकी स्थिती भारतीय शेतकऱ्यांनी निर्माण केली आहे. तथापि ते स्वत: मात्र कर्जाच्या खाईत व दारिद्र्यात लोटले गेले आहेत. याचे मुख्य कारण आजही शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही हे आहे. भारतीय बाजारपेठांची रचनाच अशी तयार झाली आहे की संघटीत समाज भोगवादी वस्तुला अधिक किंमत मोजतो तर जीवनास आवश्यक असणाऱ्या वस्तुस कमी किंमत मोजतो. या समाजधारणेमुळे व शेतमालाच्या विपनणातील भावी समस्यामुळे आजही धान्य उत्पादक शेतकरी कमालीच्या वाईट स्थितीमध्ये जीवन जगत आहे. १९३० मध्ये भारताच्या शेतीविषयक रॉयल कमिशनने असे म्हटले होते कि 'भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो व कर्जातच मरतो' तसेच त्यात पुढे असे ही म्हटले की 'शेतकऱ्यांची समृध्दी व शेतीसुधारणा विषयक धोरणांचे यश हे शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्रीव्यवस्थेची किती प्रमाणात उपलब्धता असते यावर अवलंबून असते' या विधानातच शेतमालाच्या विक्री व्यवस्थेचे मर्म व महत्व सामावले आहे.[१]

कोणतेही कार्य यशस्वी होण्यासाठी नियोजन व नियमन या दोन सूत्रांचा अवलंब केल्याखेरीज भागत नाही. कोणतीही वाढ योजनाबध्द व नियंत्रित असेल तरच ती निकोप असते. कृषिउत्पन्नाला देखील हाच न्याय लागू आहे. आपल्या देशातील मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला नाही तर किंवा त्याचा माल विकला जाताना तो फसविला गेला तर त्याच्या व्यवसायात त्याला नुकसान सोसावे लागेल . त्याचा परिणाम शेती उत्पादनावर होईल. असे होवू नये म्हणून व शेतीउत्पादनात वाढ व्हावी म्हणून शेतकऱ्यास उत्साह वाटेल असे योग्य भाव त्या उत्पादनाला मिळायला हवेत. त्यांनी खूप परिश्रम करावेत व त्यांनी केलेल्या परिश्रमाचा फायदा, काहीही कष्ट न करणाऱ्या मध्यस्थाने किंवा पैसे असणाऱ्या साठवणूकदारांनी त्या मालाची साठवणूक करून त्याचा फायदा घ्यावा, ही बाब न्यायिक ठरणार नाही. मध्यस्थामार्फत तो फसविला जाऊ नये व भाव पडले तर शेतमालाची साठवणूक करण्याची योजना झाली पाहिजे.

बाजारपेठामध्ये मूलभूत सुविधांची गरज पूर्ण करण्यासाठी, शेतमालाची योग्य प्रतवारी व साठवणूक व्यवस्था करण्यासाठी, बाजारपेठेतील वाद सोडविण्यासाठी तसेच शेतकऱ्याला बाजारसमितीवर योग्य प्रतिनिधित्व असावे ह्याच उद्देशाने व हेतुने वेगवेगळ्या राज्यात शेतमालाच्या बाजार नियंत्रणाचे कायदे करण्यात आले आहेत.

## २. भारतातील कृषि बाजार नियंत्रणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतात ब्रिटीश राजवटीने बाजार नियंत्रण व बाजारपेठांचा विकास यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. ब्रिटीशांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा मूळात कच्च्या मालाचा पुरवठादार असा होता. शेती किंवा शेतकऱ्यांचा विकास असा त्यांचा दृष्टीकोन कधीच नव्हता. ब्रिटीश राजवटीने शेती उत्पादन आणि बाजार नियंत्रणातील जे कायदे केले होते, ते कच्च्या मालाच्या सुरक्षित व कायदेशीर पुरवठ्यासाठी होते. ब्रिटीशांच्या धोरणानुसार सन १८८६ मध्ये हैद्राबाद रेसीडेन्सी ऑर्डर अन्वये विदर्भातील कारंजा येथील कपाशीचा बाजार प्रथम नियंत्रित केला गेला. प्रथमच केलेल्या या बाजार नियंत्रणाच्या आदेशाचा हेतू शेतकऱ्यांचे हित हा नव्हता तर मँचेस्टर येथील कापड गिरण्यांना चांगल्या प्रतिच्या कापसाचा योग्य किंमतीत व खात्रीचा पुरवठा करणे हा होता. त्याच्यानंतर सन १८९७ मध्ये 'बिरर कॉटन अॅन्ड ग्रेन्स मार्केट'ला लागू करण्यात आला. या कायद्याला ६ मे १८९७ रोजी गव्हर्नर जनरलने मान्यता दिल्यामुळे या बाजार नियंत्रणाच्या कायद्याला वैधानिक स्वरूप प्राप्त झाले. या कायद्यातील प्रमुख दोष म्हणजे बाजार समितीवर शेतकऱ्याला प्रतिनिधित्व देण्यात आलेले नव्हते. वास्तवात शेतकऱ्याला कायदेशीर संरक्षण देण्याची गरज होती.[२]

१९१७ मध्ये गव्हर्नर जनरलने इंडियन सेन्ट्रल कॉटन कमिटीची नियुक्ती कापसाच्या बाजारपेठेतील समस्यांचा अभ्यास करण्यासाठी केली. समितीच्या असे निदर्शनास आले की, शेतकरी हे आपले उत्पादन गावातील सावकारी वजा व्यापारी यांना त्यांच्या सावकारीमुळे कमी किमतीत विकत असत. तसेच इतर शेतकऱ्यांना दलालांच्या साखळीमुळे किंमत मिळत नव्हती, म्हणून कमिटीने १८९७ च्या कायद्यावर आधारित बाजारांची शिफारस केली. ही शिफारस मुंबई प्रांताने १९२७ मध्ये प्रथम लागू केली आणि 'बॉम्बे कॉटन मार्केट अॅक्ट'ची निर्मिती केली. या कायद्यात कपाशीच्या बाजारपेठा नियंत्रित करणे हा हेतू होता. या कायद्याने शेतकऱ्यांना बजार समितीवर प्रतिनिधित्व देण्यात आले. सन १९३०-३१ मध्ये धुळे येथील कपाशीची बाजारपेठ पहिल्यांदा या कायद्याद्वारे नियंत्रित करण्यात आली.[३]

सन १९२८ मध्ये रॉयल कमिशन ऑन अॅग्रिकल्चरमुळे बाजार नियंत्रणास जोराने चालना मिळाली. बाजारांतील तत्कालीन परिस्थितीवर या कमिशनने विदारक प्रकाश पाडला आणि निर्वाळा दिला की, हे दोष केवळ नियंत्रित बाजार स्थापन करूनच काढून टाकता येतील. अशा बाजारांची स्थापना केल्यास हिंदुस्थानांतील शेतकरीवर्गाला अतोनात फायदा मिळवून दिल्यासारखे होणार आहे.

रॉयल कमिशनच्या सुमारास हिंदुस्थनात कपाशीच्या बाजारपेठा नियंत्रित केलेल्या होत्या. कपाशीच्या बाबतीत बाजारनियंत्रणामुळे जर चांगले भाव, चोख वजन, बेकायदेशीर कपातीपासून मुक्तता वगैरे गोष्टी साध्य होऊ शकतील, असे कमिशनचे मत बनले व मुंबई प्रांताच्या धर्तीवर बाजार नियंत्रित करण्याची कमिशनने शिफारस केली. कमिशनच्या प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे आहेत-

१) कपाशीबरोबरच सर्वच कृषिउत्पादनाचा या कायद्याअंतर्गत समावेश करण्यात यावा.

२) समस्या निवारण्यासाठी विशेष मंडळाची स्थापना करण्यात यावी.

३) उत्पादक व विक्रेता यांच्यामधील दलालावर बंदी घालणे.

४) मालाची साठवणूक करण्यासाठी अत्याधुनिक व्यवस्था असावी.

५) वजने आणि मापे यांचे आधुनिकीकरण.

६) एकाच प्रांतीय कायद्यान्वये त्या प्रांतातील सर्व बाजार समित्यांची स्थापना व नियंत्रण करणे.[४]

रॉयल कमिशनने बाजार- नियंत्रणावर भर दिल्यामुळे बऱ्याच प्रांतात त्या दिशेने प्रयत्न सुरू झाले. बॉम्बे कॉटन मार्केट्स ॲक्ट, १९२७ या कायद्याच्या धर्तीवर हैद्राबादमध्ये सन१९३० मध्ये हैद्राबाद ॲग्रिकल्चरल मार्केट्स ॲक्ट, १९३० लागू करण्यात आला. पुढे कपाशीव्यतिरिक्त इतर शेतीमालाच्या बाजारपेठा नियंत्रण करता याव्यात म्हणून सन १९३५ मध्ये मध्य प्रांतात सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट्स ॲक्ट करण्यात आला. हे कायदे झाल्यानंतर विदर्भातील १८९७ चा कॉटन व ग्रेन मार्केट लॉ रद्द करण्यात आला.[५]

सन १९३८ मध्ये सेंट्रल मार्केटिंग डिपार्टमेंटने बाजार नियंत्रणाचे एक नमुनेदार विधेयक तयार केले. या विधेयकाच्या धर्तीवर बऱ्याच प्रांतांनी आपआपली विधेयके केली. मुंबई सरकारने १९३९ मध्ये 'बॉम्बे अग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट्स ॲक्ट, १९३९' मंजूर केला. कायद्याच्या परिशिष्टांत उल्लेख केलेल्या सर्व शेतीमालाकरीता हा कायदा करण्यात आलेला आहे . या कायद्यान्वये पूर्वीचा बॉम्बे कॉटन मार्केट ॲक्ट, १९२७ रद्द करण्यात आला.[६]

सी. पी. कॉटन ॲक्ट, १९३२ व ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट ॲक्ट, १९३५ या कायद्याबाबत १९४८ मध्ये दुरूस्ती करून बाजाराची व्यवस्था बाजारसमितीऐवजी सहकारी संस्थाकडे सोपविण्याची तरतूद करण्यात आली. १९३९ मध्ये म्हैसूर राज्यात म्हैसूर ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट ॲक्ट लागू करण्यात आला. १९४७ मध्ये पूर्वीच्या पतियाळा राज्याने बाजार नियंत्रणाचा कायदा केला. मध्य भारत सरकारने १९५२ मध्ये, मध्यभारत ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट ॲक्ट या

कायद्यात बॉम्बे कायद्याच्या धर्तीवर बदल केला. १९५५ मध्ये सौराष्ट्र राज्याने असाच कायदा लागू केला.[७]

भारत स्वतंत्र झाल्यावर सर्वप्रथम १९५२ मध्ये सार्वजनिक निवडणूका होऊन पहिले लोकनियुक्त सरकार स्थापन झाले. त्यानंतर राष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी पंचवार्षिक योजना स्विकारण्यात आली. या पंचवार्षिक योजनेमध्येसुद्धा देशभरातील बाजार नियंत्रणाची गरज ओळखली गेली आणि त्या अनुषंगाने हैद्राबाद येथे नोव्हेंबर १९५५ मध्ये अखिल भारतीय कृषि बाजार व्यवस्थापन व सहकार यासंदर्भात भरलेल्या परिषदेने बाजार नियंत्रणाच्या प्रमुख सुचना खालीलप्रमाणे मांडल्या-

१) बाजार नियंत्रणाचा कायदा सर्व प्रकारच्या शेती मालाला लागू करण्यात यावा.

२) ज्या राज्यामध्ये बाजार नियंत्रण चा कायदा नाही त्यांनी कायदा करावा.

३) बाजारपेठेमध्ये शेतीमालाचा उघड सौदा व वजनमापांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

४) बाजार पेठेमध्ये ज्या ज्या घटकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत त्या सर्व घटकांना बाजारसमितीत योग्य प्रतिनिधित्व द्यावे.

१९५६ मध्ये राज्य पूर्नरचनेनंतर वेगवेगळ्या राज्यामध्ये वेगवेगळे एकापेक्षा जास्त कायदे लागू झाले. त्यामुळे कायद्याचे एकत्रिकरण करणे गरजेचे ठरले. बऱ्याच पुर्नरचित राज्यांनी या कारणास्तव नवीन कायदे निर्माण केले. ज्या राज्यात कायदे अस्तित्वात नव्हते त्या राज्यांनीही बाजार नियंत्रणाचा कायदा केला.

## ३. महाराष्ट्रातील बाजार समितींचा आढावा :

महाराष्ट्रात सन १९३२ चे सुमारास वेगवेगळ्या भागात वेगवेगळे कायदे करण्यात आले. ते कायदे खालीलप्रमाणे आहेत-

१) मुंबईचा शेतीच्या उत्पन्नाच्या बाजाराबाबत अधिनियम, १९३९.

२) मध्यप्रांत व वऱ्हाड कापूस बाजार अधिनियम, १९३९.

३) मध्यप्रांत व वऱ्हाडच्या शेतीच्या उत्पन्नाच्या बाजाराबाबत अधिनियम, १९३५.

४) सन १९३९ चा फसलीचा हैद्राबादचा शेतीच्या उत्पन्नाचा बाजाराबाबत अधिनियम.

त्या त्या परिस्थितीनीरुप ते कायदे ठीक होते. बदलत्या परिस्थितीनरूप वेगवेगळ्या प्रचलित कायद्यामध्ये सुधारणा करण्याची जरूरी होती, म्हणून सर्वश्री लाल व शीरनामे समितीची नेमणूक करण्यात आली. महाराष्ट्र राज्याची स्थापना १मे १९६० रोजी झाली. राज्यकारभाराच्या दृष्टीने राज्यातील कायद्यांचे एकीकरण करण्याचे काम चालू झाले व त्यानुसार राज्यातील वेगवेगळ्या 'मार्केट कायद्यांचे' एकत्रीकरण करून सर्व राज्याकरीता एकत्र विधेयक १९६३ मध्ये प्रसिध्द करण्यात आले. त्याची अंमलबजावणी २५ मे १९६७ पासून सुरू झाली. त्याच दिवशी या कायद्याखाली केलेले नियम पक्क्या स्वरूपात प्रसिध्द झाले व कायदा आणि नियम यांची अमंलबजावणी सुरू झाली.

ह्या कायद्यात व नियंमात वेळोवेळी परिस्थितीनुरूप सुधारणा करण्यात आल्या. कायद्यातील सुधारणा एकूण १६ वेळेस करण्यात आल्या व नियमात एकूण १५ वेळा सुधारणा करण्यात आल्या . आजमितीस, कायद्यातील शेवटची सुधारणा १९९६ ची आहे व नियमाची १९९० ची आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियमन, १९६३ व त्याखालील नियम, १९६७ यांचे तरतूदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना झाली. सदर कायद्यानुसार बाजार समित्यांवर देखरेख व नियंत्रण ठेऊन, कायदा व नियमांची अंमलबजावणीची जबाबदारी सहकार खात्यांतर्गत कृषि पणन संचालनालयाकडे सोपविण्यात आली आहे. या कामात सुसूत्रता येणे व बाजार समित्यांची सर्वंकष प्रगती होण्याचे दृष्टिकोनातून जिल्हा पातळीवर जिल्हा उपनिबंधक व तालुका पातळीवर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना सदर कायद्यांतर्गत काही अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्रात एकूण २८४ बाजार समित्या कार्यरत असून ५९३ उपबाजार या बाजार समित्यांशी संलग्न आहेत. बाजार समित्यांच्या आवारात कृषि मालाची विक्रिवर ०.७५ ते १.०० टक्का या दराने मार्केट फी आकारतात. मार्केट फी मधून बाजार समित्यांना प्राप्त होणाऱ्या रकमेमधून बाजार समित्यांना कृषि मालाच्या विक्रीसाठी आवश्यक सोयीसुविधा तसेच विकासाची कामे करावी लागतात. बाजार समित्यांना मिळणाऱ्या उत्पन्नानुसार पणन मंडळास बाजार समित्यांकडून १ ते ५ टक्क्यापर्यंत अंशदान प्राप्त होत असते. या अंशदानातून कृषि पणन मंडळातर्फे बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज उपलब्ध करून देणे, तसेच कृषि विपणानाशी संबंधित विविध कार्यक्रमांची, योजनांची, प्रकल्पांची अमंलबजावणी करण्यात येत असते.

तक्ता क्र. १

राज्यातील बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या

| क्र. | विभाग | मुख्य बाजार | उप बाजार |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ११ | ३९ |
| २ | नाशिक | ५८ | ११५ |
| ३ | पुणे | ४२ | १२१ |
| ४ | औरंगाबाद | ३२ | ६९ |
| ५ | लातूर | ४४ | ८६ |
| ६ | अमरावती | ५४ | ९१ |
| ७ | नागपूर | ४३ | ७२ |
| एकूण | | २८४ | ५९३ |

**संदर्भ :** कार्यक्रम, प्रकल्प आणि योजना-माहिती पुस्तिका - महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.

महाराष्ट्रात कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियमन, १९६३ मधील कलम ३८ नुसार, राज्यातील बाजार समित्या त्यांचे वार्षिक अर्थसंकल्प मंजूरीसाठी कृषि पणन मंडळाकडे सादर सादर करतात. बाजार समित्यांच्या अर्थसंकल्पांना कृषि पणन मंडळातर्फे मंजूरी दिली जाते.

## ४. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीची पार्श्वभूमी व परिचय :

### कोल्हापूर जिल्ह्याची पार्श्वभूमी:

कोल्हापूर जिल्ह्यास तसेच कोल्हापूर शहरास ऐतिहासिक परंपरा आहे. कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडील भागावर वसला असून त्याच्या पश्चिमेस सह्याद्रीचा कडा, उत्तरेस वारणा नदी, पुर्वेस अंशत: कृष्णा नदी आहे. जिल्ह्यातील वहुतांशी भागांची समुद्रसपाटीपासूनची उंची ३३० ते ६०० मीटर आहे. जिल्ह्यात करवीर, पन्हाळा, शाहूवाडी, गगनबावडा, हातकणंगले, शिरोळ, राधानगरी, कागल, भुदरगड, गडहिंग्लज, आजरा व चंदगड हे १२ तालुके समाविष्ट आहेत. जिल्ह्यातून प्रामुख्याने पंचगंगा, वारणा, भोगावती, तुळशी, कुंभी, कासारी, कृष्णा, दूधगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी व घटप्रभा नद्या वाहतात. जिल्ह्याचे पर्जन्यमान सर्वात जास्त म्हणजे ६,९९८

मि. मि. व सर्वात कमी म्हणजे ६४३ मि. मि.असून सरासरी २,३२६ मि. मि. इतका पाऊस होतो. जिल्ह्यात भात, ज्वारी, नाचणी व कडधान्ये आणि ऊस,भुईमूग सोयबीन ही प्रमुख पिके आहेत. ऊस पिकाखालील क्षेत्र सर्वाधिक आहे. भाजीपाल्यामध्ये प्रामुख्याने वांगी, कोबी, फ्लॉवर, टोमॅटो व पालेभाज्या तर फळामध्ये द्राक्षे, पेरू, काजू, आंबा व केळी पिके आहेत. जिल्ह्यात वारणा, दूधगंगा, तुळशी, तसेच ६०६ लघू पाटबंधारे प्रकल्प आहेत, जिल्ह्यात एकूण ओलिताखालील क्षेत्र १,१२,४६७ हेक्टर आहे. पैकी १० टक्के क्षेत्र अन्नधान्याखाली व ८० टक्के क्षेत्र ऊसाखालील तर उर्वरित इतर पिकाखाली आहे. जिल्ह्यात शिरोली, गोकुळ शिरगांव, इचलकरंजी, कागल येथे पंचतारांकीत औद्यागिक वसाहती स्थापन झाल्या आहेत. जिल्ह्यात कोल्हापूर, पेठवडगाव, जयसिंगपूर व गडहिंग्लज या चार नियंत्रित बाजारपेठा आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यात १६ सहकारी साखर कारखाने असून गोकुळ दूध प्रकल्प हा भारतात नामांकित आहे तसेच वारणा दूधप्रकल्प, मयूर दूधप्रकल्प व इतर दूध संघांनी जिल्ह्यात धवलक्रांती केली आहे. सूतगिरणी, पतसंस्था यामुळे सहकारात हा जिल्हा अग्रेसर आहे. जिल्ह्यात एकूण ८,४५८ सहकारी संस्था असून ८९८ बॅकांची कार्यालये आहेत.

कोल्हापूर येथे श्री महालक्ष्मीचे प्राचीन मंदीर असून असंख्य भाविकांचे ते श्रध्दास्थान आहे, म्हणून या तीर्थक्षेत्राला दक्षिण काशी असे म्हणतात. जवळच जोतिबा हे तीर्थक्षेत्र आहे. जिल्ह्यात पन्हाळगड, भुदरगड, सामानगड हे ऐतिहासिक किल्ले आहेत. पन्हाळा हे थंड हवेचे ठिकाण आहे. इचलकरंजी हे कापड निर्मितीचे केंद्र आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूरी चप्पल देशात व परदेशात प्रसिध्द आहे. कोल्हापूरची कुस्ती परंपरा प्रसिध्द आहे. शिवाजी विद्यापीठाचे कोल्हापूरला मुख्य केंद्र आहे. संपूर्ण देशात कोल्हापूरची गूळ बाजारपेठ प्रसिध्द आहे.

**शाहूपुरी बाजारपेठेची स्थापना :**

कोल्हापूर शहरात शाहूपुरी बाजारपेठेची स्थापना होण्यापूर्वी संस्थानात कोठेच व्यापार पेठेचा विकास झालेला नव्हता. कोल्हापूर विभागांतील लोकांना व्यापारासाठी मुख्यत: परपेठावरन अवलंबून रहावे लागत असे. कोल्हापूर विभागात तयार होणारा गूळ वगैरे माल राजापूर आणि सांगली येथील बाजारपेठेत विक्रीसाठी जात असे. कोल्हापूरच्या गुळाची पूर्वी राजापूरी गुळ या नावाने प्रसिध्दी होती. कोल्हापूर विभांगात गूळ व शेंगा यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असल्याने याच जिन्नसांचा प्रामुख्याने ठोकबंद व्यापार आणि निर्यात होत असे.

इ. स. १८७१ साली उसाच्या लागवडीखाली १४,५०० एकर जमीन होती त्यावेळी सुमारे ४२३६ खंडी ( तीन हजार टन ) गुळाची निर्यातीची नोंद झाली असल्याचे आढळते.[११]

राजर्षि श्री शाहू छत्रपति महाराज गादीवर येण्यापूर्वी कोल्हापूर शहरात विशेष मोठी अशी बाजारपेठ नव्हती. १८९० च्या सुमारास कोल्हापूर शहराची लोकसंख्या सुमारे ३० ते ३५ हजार होती. त्या सुमारास जोंधळे, तांदूळ वगैरे भुसारी माल व कडधान्ये काही प्रमाणात कोल्हापुरास विक्रीस येत. गूळ व शेंगा अल्पप्रमाणात विक्रीस येत.

सन १८९५ पर्यंत कोल्हापूरचा गुळव्यापार नगरपालिकेजवळील पूर्वीच्या फरशीवर भरत असे. वर्षाला सुमारे पाच हजार गुळ रवे विक्रीस येत. दर १५ ते २० रुपये पर्यंत होता. कोल्हापूरचा गूळ बैल, घोडे व गाढवे यांच्यावरून राजापूरला जात असे आणि तेथून तो राजापुरी गूळ म्हणून कोकणात विकला जात असे. कोल्हापूरला १८९२ साली रेल्वे येईपर्यंत येथील गूळ कोकण किनाऱ्यावरून मुंबई व गुजरातकडे जात असे.[१२]

कोल्हापूर संस्थानचे द्रष्टे छत्रपती श्री शाहू महाराज सन १८९४ साली गादीवर आले. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार पेठेची मुहूर्तमेढ छत्रपती राजर्षि शाहू महाराजांनी रोवली आहे. कोल्हापूरचा गूळ रंग, रुची व टिकाऊपणा याबद्दल प्रसिद्ध पावलेने व येथील शेतकऱ्यांच्या उत्पादीत गूळास कोल्हापूर येथेच एक नवीन पेठ स्थापन करून परप्रांतात विक्रीसाठी माल पाठविणेस होणारी शेतकऱ्यांची नुकसानी व कुचंबना थांबवावी, आपला शेतकरी सुखी व समृद्ध व्हावा या उदात्त हेतूने छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांनी इ.स. १८९५ मध्ये कोल्हापूरात गूळ बाजारपेठेची स्थापना केली. राजर्षि शाहू महाराजांनी कागल येथे मुक्कामास असताना निपाणी येथील काही व्यापाऱ्यांना भेटीस बोलावून घेतले व त्यांना विशिष्ट प्रकारच्या सवलती देऊन कोल्हापूरात बाजार करण्यास उत्तेजन दिले.

राजर्षि शाहू महाराजांनी व्यापारी वर्गाला ज्या विशेष सवलती दिल्या त्यापैकी काही सवलती पुढीलप्रमाणे होत्या.

१) व्यापाऱ्यांना आर्थिक मदत देणे व कराच्या बाबतीत माफी व सवलती देणे.

२) रेल्वे वॅगन्स मिळण्यासंबंधी खटपट करणे.

३) व्यापारी मालाच्या गाड्या वेठीस न धरणे.

४) व्यापारीपेठेस समक्ष भेट देऊन व्यापाऱ्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्या तात्काळ दूर करणे.

५) व्यापारी पेठेच्या उन्नतीबाबत विचार विनियम करून त्याबाबत प्रयत्न करणे.[१३]

अशाप्रकारे महाराजांनी व्यापाराला सर्व प्रकारे उत्तेजन दिल्यामुळे व्यापाराची वाढ होऊ लागली.

नवीन व्यापार पेठेसाठी रेल्वे स्टेशन नजीकची जागा मुक्रर करण्यात येऊन सध्याच्या शाहूपुरी व्यापार पेठेची स्थापना करण्यात आली. या नवीन व्यापार पेठेत व्यापाऱ्यांना दुकाने बांधण्यासाठी प्लॉटस् पाडून ते मोफत दिले. त्यामुळे दूरदूरच्या ठिकाणचे व्यापारी कोल्हापूरात येऊन स्थायीक झाले व व्यापार पेठेची वाढ झपाट्याने होऊ लागली.

पहिल्या महायुद्धाच्या वेळी व नंतरच्या काळात कोल्हापूरची पुष्कळच वाढ झाली. कोल्हापूरचा गूळ कच्छ, काठेवाड, गुजरात, मुंबई,मध्य प्रांत, कर्नाटक वगैरे भागात जाऊ लागला आणि चवीच्या, गुणाच्या बाबतीत तो सर्वश्रेष्ठ असल्याची ख्याती झाली. शेंगेचाही व्यापार वाढला. आसपासच्या ४०-५० मैलाच्या टापूतील शेंग विक्रीसाठी बाजारात येऊ लागली. तेलाच्या दोन गिरण्या स्थापन झाल्या. रॅली ब्रदर्स, होलकार्ट ब्रदर्स अशा नामवंत परदेशी व्यापार कंपन्यांच्या पेढ्या येथे सुरू झाल्या. येथील जाड्या शेंगदाण्याची परदेशात प्रसिध्दी झाली. येथून परदेशी माल जाऊ लागला. तसेच कापूस, हळद, वगैरे मालाची पेठेत आवक होऊ लागली.[१४]

परंतु उपरोक्त मालाचा व्यापार हंगामी स्वरूपाचा असल्याने इतर वेळी व्यापार व काम कमी असे म्हणून व्यपाऱ्यांनी हरभरे, तांदूळ, गहू, ज्वारी अशा भुसारी आणि किराणा मालाच्या व्यापारास मोठ्या प्रमाणावर सुरूवात केली. कोल्हापूर शहर हे देश व कोकणच्या प्रवेशद्वारावरील पुण्याखालोखालचे मोठे शहर असल्याने येथे मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू झाला व कोल्हापूरला व्यापारीदृष्ट्या अत्यंत महत्व प्राप्त झाले.

राजर्षि शाहू महाराजांनी ऊसाला पाणी पुरवठा व्हावा म्हणून राधानगरी धरणाचा पाया घातला. ऊसाची शेती खर्चाची असल्याने शेतकऱ्यांना पेंड, सल्फेट, पैसा यांचा पुरवठा पेठेतील व्यापारी वर्गाकडून होऊ लागला आणि कोल्हापूरची ऊसाची शेती व शाहूपुरी गूळ पेठेची वाढ होत गेली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सुमरे १०० वर्षापूर्वी हा व्यापार उघड पध्दतीने होत असे. व्यापाऱ्यांचा व पेठेचा विस्तार होऊ लागल्यावर त्याला काही पध्दती असावी, नियम असावेत,

नियमन योग्य प्रकारे व्हावे व सर्व व्यवहारात एकसूत्रीपणा आणि पारदर्शीपणा यावा म्हणून तारीख २७ ऑगस्ट १९२७ इ. रोजी शाहूपुरी मर्चंट्स असोसिएशनची स्थापना करण्यात आली. त्यामुळे व्यापार वाढीला उत्साहाने चांगले वळण लागले. शाहूपुरी असोसिएशनची शाहूपुरी व्यापारपेठेचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली. त्यांनी त्यांच्यातर्फे अनेक लोकोपयोगी संस्था सुरू करण्याच्या बाबतीत मोठा पुढाकार घेतला होता.[१५]

१९३८ साली कोल्हापूर दरबाराने डॉ. पी. सी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व्यापाराची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने प्रथमच बाजार पेठातील व्यवहाराचे नियंत्रण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व त्या दृष्टीने कोल्हापूर दरबाराला काही शिफारशी ही केल्या त्यातील मुख्य शिफारशी पुढील प्रमाणे :

१) बाजार पेठातील व्यवहार पध्दतीवर नियंत्रण असावे.

२) वजन मापांचे प्रमाण निश्चित करावे.

३) वजन मापांची वारंवार तपासणी केली जावी.

४) अशा प्रकारच्या कामासाठी एक स्वतंत्र वजन माप कचेरी उघडून निरनिराळ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

डॉ. पी. सी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नेमल्या गेलेल्या ''व्यापार चौकशी समिती'' च्या या शिफारशी अंमलात आणण्यास १९४१ साली सुरूवात झाली. मुंबई राज्यातील वजनमापांचा १९३२ सालचा कायदा कोल्हापूर संस्थानला लागू करण्यात आला.[१६]

## शेतीउत्पन्न बाजार समितीची स्थापना :

शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या अनेक गोष्टी करणे त्यावेळच्या कोल्हापूर संस्थानच्या रिजन्सी कौन्सिलला आवश्यक वाटले त्यांत व्यापारपेठेचे नियमन करणे या गोष्टीला प्राधान्य देण्यात आले. कारण शेतकऱ्याने पिकविलेल्या मालाला योग्य किंमत आल्याशिवाय शेतकऱ्याची परिस्थिती सुधारणार नाही याविषयी दुमत नव्हते. असे नियमन करण्यापूर्वी कोल्हापूर संस्थानातील बाजारपेठांची पहाणी करणे रिजन्सी कौन्सिलला जरूर वाटले. अशा प्रकारच्या पहाणीसाठी कोल्हापूर संस्थानातील माजी अकौटंट जनरल श्री. नारायणराव गोपाळराव सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीचे सभासद पुढील प्रमाणे होते :

१) श्री. डी. एस.खांडेकर - बी. ए. एल. एल. बी .

२) श्री. ग. सि. चौगुले.

३) श्री रा. म. पाटील.

४) श्री ज. ग. जामसांडेकर

५) श्री. चं. गो. नरके

६) श्री. डी. ए.सावंत ( चिटणीस )

७) श्री के.जी. नागेशकर ( मार्केटिंग ऑफिसर )

याच सुमारास कोल्हापूर संस्थानच्या विधिमंडळाने मुंबई राज्यातील ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट ॲक्टच्या धर्तीवर ''कोल्हापूर ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट ॲक्ट, १९४५'' हा कायदा पास केला. या कायद्याची अमंलबजावणी कोणत्या प्रकारे करावयाची यासबंधीही उपरोक्त समितीकडून शिफारशी मागविण्यात आल्या होत्या. समितीने त्यासंबधीच्या आपल्या शिफारशी, तात्पुरता अहवाल म्हणून तारीख १३-०९-१९४५ इ. रोजी कोल्हापूर दरबाराला सादर केला.[१७]

या समितीच्या शिफारशीनुसार ता १५/१०/१९४५ इ. पासुन ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट ॲक्ट (मुंबई १९३९) ची गुळ आणि शेंगा या पिकांच्याबाबतीत अंमलबजावणी सुरू झाली.

उपरोक्त कायद्यातील तरतूदीनुसार अकरा सभासद असलेल्या 'दि कोल्हापूर ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट कमिटी'ची स्थापना करण्यात आली. या अकरा सभासदात चार शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, चार स्थानिक व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी, एक कोल्हापूर नगरपालिकेचा प्रतिनिधी व दोन सरकार नियुक्त असे लोक होते. या मार्केट कमिटीची नेमणूक सरकारने ता. २५ ऑक्टोबर १९४५ इ. रोजी केली.

अशा प्रकारे शाहूपुरी बाजार पेठेवर शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिने नियंत्रणास सुरूवात झाली. परंतु या उपक्रमाचे शाहूपुरी बाजार पेठेतील व्यापारी वर्गांकडून स्वागत झाले नाही. त्यांनी अशा प्रकारच्या नियंत्रणाला तीव्र विरोध केला व नवीन मार्केट कमिटीशी असहकार पुकारला. नंतर या कमिटीच्या कामकाजासंबंधी व्यापारी प्रतिनिधी यांच्यामध्ये वाटाघाटी सुरू झाल्या. ता. २२ फेब्रुवारी १९४६ इ. रोजी उभयपक्षी तडजोड होऊन सुरूवातीच्या मार्केट कमिटीच्या स्वरूपांत पुढीलप्रमाणे बदल करण्यात आला,

१) मार्केट कमिटीच्या सभासदांची संख्या अकरा ऐवजी पंधरा करण्यात आली.

२) पंधरा सभासदापैकी सात सभासद व्यापाऱ्यांपैकी व सात सभासद शेतकऱ्यांच्यापैकी ठेवण्यात आले.

३) स्थानिक स्वराज्य संस्थेचा एक प्रतिनिधी घेतला व सरकार नियुक्त सभासद कमी करण्यात आले.

या तडजोडीनुसार पहिल्या मार्केट कमिटीचे सभासद पुढीलप्रमाणे होते-

**- स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी:-**

१) श्री. द.मा. सोळोखे ( चेअरमन )

**- शेतकरी प्रतिनिधी :-**

१) श्री. ना. तु. सरनाईक

२) श्री. जी. एल. माने.

३) श्री. ता. गो. मोहिते

४) श्री. वाय. बी. पाटील

५) श्री. एस. ए. पाटील

६) श्री. व्ही. एल. पाटील

७) श्री. के. जी. यादव

**- व्यापारी प्रतिनिधी:**

१) श्री. ए. बी. पाटील.

२) श्री. बा. दा. मंडपे

३) श्री. व्ही. के.देसाई

४) श्री. जयरामभाई करसन

५) श्री. मुरारजी खेमजी

६) श्री. रा. अ. महाजन

७) श्री. शांतीनाथ तवनाप्पा पाटणे [१८]

सुरूवातीस मार्केट कमिटीस दरबाराने ४,००० रू. मदत म्हणून दिले होते. यातून पहिल्या वर्षाचा प्राथमिक खर्च, नोकर पगार वगैरे करण्यात आला.

कोल्हापूर ॲग्रिकल्चरल प्रोड्युस ॲक्ट (१९४५ ) या कायद्यान्वये शाहूपुरीतील गूळ आणि शेंगाची बाजारपेठ हा 'बाजार विभाग' म्हणून जाहीर करण्यात आला. कोल्हापूर नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व बाजार हा 'बाजार' असे गॅझेट करण्यात आले. 'बाजार- विभागाच्या' बाहेर होणारे गूळ आणि भुईमूग शेंगेच्या बाबतीतील खरेदी विक्रीचे व्यवहार बेकायदेशीर ठरविण्यात आले. व्यापार पेठेतील खरेदी विक्रीच्या व्यवहारातील सर्व घटकांना मार्केट कमिटीकडून परवाना घेण्याचा दंडक घातला गेला. अशारितीने मार्केट कमिटीच्या कामास सुरूवात झाली.[११]

स्थापनेच्या वेळी एका बाजूला असलेली शाहूपुरी बाजारपेठ शहराच्या विस्तारामुळे मध्यवस्तीत येऊ लागल्याने शाहूपुरी मर्चन्ट्स असोसिएशनने संस्थानाकडे मार्केटसाठी नवीन जागेची मागणी केली होती. ही जागा म्हणजे सध्याचा श्री शाहू मार्केट यार्डाचा परिसर होय. असोसिएशनच्या मागणीची पुर्तता छत्रपती श्री राजाराम महाराज यांच्या अकाली निधनामुळे होवू शकली नाही. शाहूपुरी व्यापार पेठेची वाढ सारखी चालूच होती. यावेळी कोल्हापूर संस्थानांत रिजन्सी कौन्सिलची कारकीर्द सुरू झाली. १९४५ पर्यंत गूळ व्यापार असोसिएशनच्या नियंत्रणाखाली चालू होता. त्याच साली रिजन्सी कौन्सिलने गूळ व्यापाराला मार्केट ॲक्ट लागू केला आणि मार्केट कमिटीच्या नियंत्रणाखाली हा व्यापार होवू लागला.

रिजन्सी कौन्सिलने मार्केट ॲक्ट लागू झाल्याबरोबरच रव्यामागे तीन आणे असा मार्केट सेस बसविला. व्यापाऱ्यांचा इतक्या जबर कराला विरोध होता पण रिजन्सी कौन्सिलच्या कारकीर्दीतील संस्थानचे लोकप्रिय डेव्हलपमेंट सेक्रेटरी श्री जे. पी. नाईक यांनी या कराची सर्व रक्कम मार्केटच्या विकासासाठी खर्च गेली जाईल असे स्पष्ट व समाधानकारक आश्वासन दिले. गुळावरील या सेसची रक्कम अकरा लाख रूपयांपर्यंत जमली. पण पुढे रिजन्सी कौन्सिल बरखास्त झाल्यामुळे हा प्रश्न तसाच राहीला. संस्थानच्या विलिनीकरणानंतर नवीन मार्केट यार्ड स्थापन होण्याच्या प्रयत्नाला पुन्हा चालना मिळाली. त्यावेळचे कोल्हापूरचे कलेक्टर डॉ. ए.यू. शेख यांच्या प्रयत्नाने आणि मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री ना . मुरारजी देसाई व स्थानिक स्वराज्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या सहानुभूतीने सध्याच्या मार्केट यार्डाची १२५ एकर जागा मार्केट कमिटीच्या ताब्यात मिळाली आणि मार्केट कमिटीच्या इमारतीची पाया भरणी १९५५ मध्ये ना. मुरारजी देसाई यांच्या शुभ हस्ते झाली.

त्यानंतर मुंबईसरकारने एका खास गॅझेट नुसार ता. ०१/१२/१९५८ पासून शाहूपुरी बाजार पेठेतून सर्व व्यवहार नव्या मार्केट यार्डात स्थलांतरीत करण्याचा आदेश बाजार कमिटीस दिला.

मधल्या काही अडचणीनंतर नवीन यार्डावर ०७-०१-१९५९ रोजी रितसर व्यापार सुरू झाला. या सर्व कालाखंडातील नमूद करण्याची गोष्ट अशी की, फरशीवरून शाहूपुरीत तट्ट्याचे छप्पर घालून ज्या तीन-चार दलालांनी व खरेदीदारांनी व्यापार सुरू केला, त्यापैकी विक्रीमध्ये भा. बा. चौगुले आणि खरेदीमध्ये किसनदास गोवर्धन या पेढ्या आजतागायत चालू आहेत.[२०]

## कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर : परिचय-

राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांनी सन १८९५ मध्ये कोल्हापूरात गूळ बाजारपेठेची स्थापना केली. कोल्हापूर संस्थानाने मार्केट कायदा १५ ऑक्टोबर १९४५ ला या पेठेस लागू केला. पूर्वीच्या काळी सन १९३९ चा कायदा लागू होता. सध्या कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर ही संस्था महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ आणि त्याखालील नियम, १९६७ या कायद्यानुसार कामकाज करीत आहे.

**बाजार समितीचे बाजार क्षेत्र :**

कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात खालील तालुक्यांचा समावेश होतो -

१) करवीर २) पन्हाळा

३) राधानगरी ४) गगनबावडा

५) भुदरगड ६) शाहुवाडी


७) कागल तालुक्यातील वेदगंगा नदीच्या उत्तरेकडील ४३ गावे.[२१]

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात एकूण ७१२ गावे आहेत. कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिम भाग हा प्रामुख्याने बाजार समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये येतो. (नकाशा क्रमांक १)

**प्रमुख बाजार आवार 'श्री शाहू मार्केट यार्ड'ची रचना :**

'श्री शाहू मार्केट यार्ड' म्हणजे कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचा प्रमुख बाजार आवार आहे. श्री शाहू मार्केट यार्ड हे पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या पश्चिमेला आहे. यार्डाचा परिसर हा ४८.१४ हेक्टर म्हणजेच जवळजवळ १२५ एकर जागेचा आहे. यार्डाची रचना ही सुनियोजीत आहे. बाजार आवार संपूर्णत: बंदिस्त व सुरक्षित आहे. बाजार समितीने घालून दिलेल्या नियमानुसार व्यापाऱ्यांना मालकी तत्वावरती अडत दुकानासाठी जागा देण्यात आलेली आहे. कमिशन एजंट विभागामध्ये ३३५ गाळे आहेत व विक्रेता विभागाकडे ९८ गाळे आहेत. व्यापाऱ्यांनी स्वत:च्या मालकीचे दुकान गाळे व गुदामे बांधलेली आहेत आणि दुकान गाळ्यांच्या समोरचा भाग

नकाशा क्रमांक १


कोल्हापूर जिल्हा
शाहूवाडी तालुका
कागल तालुका
गडहिंग्लज तालुका
कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्र

बाजार समितीने घालून दिलेल्या नियमानुसार बांधला आहे. बाजार समितीचे मुख्य कार्यालय हे मध्यवर्ती वसलेले आहे. मुख्य कार्यालयाच्या समोरील जमिनीचे प्लॉट्स हे पोस्टऑफीस, बँका इ. सारख्या नागरी सुविधांसाठी दिलेली आहेत.

**दुय्यम बाजार आवार :**

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या नियंत्रणाखाली ७ दुय्यम बाजार आवार आहेत. यामध्ये तीन दुय्यम बाजारांची मालकी समितीकडे आहे तर राहीलेल्या दुय्यम बाजारांची मालकी ही कोल्हापूर महानगरपालिकेकडे आहे. शहरातील दुय्यम बाजार हे वेगवेगळ्या कृषि मालाच्या नियमनासाठी आहेत. उदा. लक्ष्मीपुरीत धान्य व्यापार भरतो, सुभाष नगरात चमड्यांचा व्यापार तर वाशी नाक्याला गवताचा बाजार भरतो.

कोल्हापूर कृषिउत्पन्न बाजार समितीच्या नियंत्रणाखालील दुय्यम बाजार आवार पुढीलप्रमाणे-

- **दुय्यम बाजार आवार :**

| अ.नं. | उपबाजाराचे नाव | कामकाज सुरवात तारीख |
|---|---|---|
| १) | मलकापूर उपबाजार | ०१-०९-१९६० |
| २) | लक्ष्मीपुरी फरशी- शाहुपुरी धान्य उपबाजार | १९-०८-१९६९ |
| ३) | कागल उपबाजार | १९-०८-१९७७ |
| ४) | उद्यमनगर गवत उपबाजार | ३०-११-१९७८ |
| ५) | वाशी नाका गवत उपबाजार | ३०-११-१९७८ |
| ६) | सुभाषनगर चामडी कातडी उपबाजार | ३०-११-१९७८ |
| ७) | टेंबलाईवाडी उपबाजार | ०२-०४-१९८९. [२१] |

**'श्री शाहू मार्केट यार्ड' कोल्हापूर बाजार आवारातील सुविधा :**

'श्री शाहु मार्केट यार्ड' कोल्हापूर या प्रमुख बाजार आवारात कृषि उत्पन्न बाजार समितीने कायद्यानुसार आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा तसेच त्यांच्या स्वत:च्याही सेवा सुविधा पुरविलेल्या आहेत. सध्या प्रमुख बाजर आवारात खालील सुविधा उपलब्ध आहेत,

१) मध्यवर्ती कंर्यालय इमारत

२) मल्टीपरापज इमारत ( शेतकरी निवारा )

३) श्री शाहू सांस्कृतिक मंदिर व कुस्ती आखाडा

४) मजूर विश्रांती गृह

५) पोस्ट ऑफिस इमारत

६) कांदा गुदाम गाळे इमारत

७) तंबाखू गुदाम गाळे इमारत

८) स्टोअर इमारत

९) कॅन्टीन इमारत

१०) गरजेचे गाळे इमारत

११) नवीन दुकान गाळे इमारत

१२) फळे-भाजीपाला मार्केट युनिट नं. १ ( ५४ गाळे )

१३) फळे-भाजीपाला मार्केट युनिट नं. २ ( ५१ गाळे )

१४) वॉचमन चौकी ५ इमारती

१५) पोलिस चौकी इमारत

१६) विहीर, पाण्याची टाकी

१७) रस्त्यावरील दिव्यांची सोय

१८) सुलभ शौचालय इमारत

१९) प्रसाधन गृहे

२०) राष्ट्रीयकृत व्यापारी व सहकारी बँका

२१) साठवणूक गोदामे

२२) उद्याने, सावली देणारी झाडे, शेतकरी शिल्प

२३) रेल्वे गुड्स स्टेशन

२४) पेट्रोल पंप

२५) जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा

२६) ३० टनी भुई- ( वेब्रीज ) काटा

२७) मिनी होलसेल मार्केट इमारत ( ७२ गाळे )

२८) विंधन विहरी - पाच

२९) सभापती निवास.[२२]

**बाजार समितीच्या नियमनाखाली कृषि उत्पन्न व इतर वस्तूंची नावे :**

अ) गूळ, शेंग (फोडलेली व न फोडलेली), कांदा, बटाटा, लसूण, बांबू व जळावू लाकूड .

ब) भाजीपाला : कोबी, वांगी, टोमॅटो, ओली मिरची, ढबू मिरची, गवार, घेवडा, ओला वाटाणा, फ्लॉवर, कोथंबीर, पालेभाज्या, दोडका, कारली, भेंडी, रताळी, मुळा, काकडी, गाजर, वरणा, पडवळ, दूधी भोपळा, हिरवा टोमॅटो, वाल, बिनीस, मका कणिस, आले, नवलकोल, बीट, ओली शेंग, हरभरा पेंड्या, पापडी, कैऱ्या, शेवगा शेंग, खाऊची पाने, कवाळ.

क) फळे : मोसंबी, संत्री, आंबा, चिक्कू, सफरचंद, डाळिंबे, द्राक्षे, बोरे, कलिंगडे, अंजिर, रामफळ, अननस, सिताफळ, अलू बकर, नासपती, पेरू, पपई, लिंबू.

ड) धान्ये, कडधान्ये : भात, तांदूळ, ज्वारी, बाजरी, हरभरा, गहू, तूर, मूग, मसूर, उडिद, चवळी, सोयाबीन, मका, कुळती, वाटाणा.

ई) जनावरे : म्हैस, बैल, गाय, रेडा, बकरी, शेळी, मेंढी.

फ) इतर : गवत, वैरण, चामडी, कातडी, कापूस (सरकी काढलेला व सरकी न काढलेला)[२३]

## कोल्हापूर शेती उत्पन्न बाजारसमितीची कार्यपद्धती :

**बाजार समितीतील कर्मचारी वर्ग :**

बाजार समितीचा सचिव हा प्रमुख प्रशासकीय अधिकारी आहे. सध्या प्रशासकीय विभागात कायम १७८ व हंगामी ४ असे १८२ सेवक काम करत आहेत. त्यापैकी २७ कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे.[२४]

**परवानाधारक :**

या समितीचे मुख्य व दुय्यम बाजार क्षेत्रात नियमित शेती मालाचे खरेदी विक्रीचा व्यवहार करण्यासाठी समितीकडून परवाना घ्यावा लागतो. सध्या ६७९ अडते, ३३१ व्यापारी, ३६२ हमाल, २८५ मदतनीस, १७७ तोलाईदार इ. परवानाधारक आहेत. बाजारपेठेस माथाडी, हमाल व इतर असंघटीत कामगार (रोजगार आणि कल्याण) कायदा, १९६९ लागू केला आहे.[२५]

**शेतीमाल विक्री पद्धत :**

मार्केट यार्डवर शेतीमालाची विक्री उघड लिलाव पद्धतीने होते. सौद्याच्यावेळी समितीचे कर्मचारी हजर राहून मालाची आवक, किंमत, खरेदीदाराचे नाव इत्यादी नोंदी लिहून घेत असतात.

**वजनमापाची पद्धत :**

शेतकऱ्यांच्या मालाचे वजन हे चोख होण्यासाठी वजन मापाचे काम हे अडत दुकानात परवानाधारक तोलाईदारामार्फत केले जाते. बाजार समितीचे निरीक्षक वारंवार वजने व मापे यांची तपासणी करतात. समितीने ३० टनी वजन काटाही बसविला आहे.

**प्रतवारी पद्धत :**

शेतीमालाचे विविध प्रकार, आकारमान आणि उत्पादन व वापर यातील तफावत त्यामुळे प्रतवारी पद्धत गुंतागुंतीची असते. परंतू समितीने सुनियोजित प्रतवारी पद्धत अवलंबिली आहे. सध्या गूळासाठी रंग, रूची, चव यानुसार अडते प्रतवारी करतात. भुईमूग शेतमालाची प्रतवारी शास्त्रीय पद्धतीने केली जाते. राहिलेल्या शेतमालाची प्रतवारी व्यापारी पद्धतीने केली जाते. प्रतवारीमुळे चांगल्या मालाला चांगला भाव मिळतो.

**शेतमाल साठवणूक व्यवस्था :**

व्यापारातील तेजी, मंदी व मागणी, पुरवठा यांचा लाभ घेण्यासाठी तसेच शेतीमाल तारणावर कर्ज घेणेसाठी साठवणूकीची व्यवस्था शेतकऱ्यांच्या दृष्टीने हितावह आहे. या बाजारपेठेत अडते, व्यापारी, सहकारी संस्था यांची गोदामे आहेत. कागल उपबाजारमध्ये केंद्रीय ग्रामीण गोदाम योजनेअंतर्गत गोदाम बांधण्यासाठी मंजूरी घेतली आहे.

**बाजार समितीचे दरदाम माहिती प्रसिद्धी :**

बाजारपेठांचे वाढते महत्त्व लक्षात घेता बाजार वृत्त प्रसिद्धी योजनेस अग्रक्रम देणे आवश्यक झाले आहे. या दृष्टीने या बाजारपेठेवर होणारी रोजची आवक, विक्री, शिल्लक, दरदाम यासंबंधीची माहिती रोजच्या रोज तारेने, स्थानिक वर्तमानपत्रातून, इंटरनेटद्वारे http://www/msamb.com व http://www/agmarknet.net.in या वेबसाईटवरून प्रसिद्ध केली जाते.

**सहकारी कर्ज वसूली :**

मार्केट अधिनियमानुसार सहकारी संस्थांची कर्जवसुली करणेचे काम बाजार समितीवर सोपविण्यात आलेले आहे. सदर योजनेनुसार माल विक्री रक्कमेच्या ४० % प्रमाणे सहकारी कर्जाची वसुली बाजारपेठेवर केली जाते.

**बाजार माहिती केंद्राची स्थापना :**

केंद्र शासन पुरस्कृत योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या मदतीने श्री शाहू मार्केट यार्ड वर बाजार माहिती केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच शेतकऱ्यांना इतर बाजार समित्यांमधील शेतीमालाचे दर, आवक, उलाढाल तसेच शेतीमालाचे उत्पादन, साठवणूक, निर्यात याबाबतची माहिती होण्यासाठी सदरची माहिती संगणकाद्वारे http://www/msamb.com व http://www/agmarknet.net.in या वेबसाईटवरील प्रोजेक्शन टी.व्ही. वर दाखविले जाते.

**आरोग्यवर्धक गूळ प्रकल्प :**

कोल्हापूर ही गूळाची प्रसिद्ध व्यापार पेठ असून गूळ जास्त टिकला पाहिजे व कमी रासायनिक पदार्थ वापरून गूळ कसा करता येईल यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या मार्गदर्शनाने व राहुरी कृषि विद्यापीठाचे ऊस व गूळ संशोधन केंद्र, कोल्हापूरचे सहकार्याने कदमवाडी येथे आरोग्यवर्धक गूळ चाचणी प्रकल्प सुरू केला आहे.

**वार्षिक उलाढाल :**

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमध्ये योग्य कामकाज पद्धतीमुळे शेतीमालाच्या खरेदी विक्रीची मोठ्या प्रमाणात उलाढाल होते.

**तक्ता क्र. २**

सन २००२-२००३ मधील बाजार आवारातील शेतीमालाची आवक, विक्री व किंमत दर्शविणारा तक्ता

| अ. नं. | शेतीमालाचे नाव | आवक क्विंटल | विक्री क्विंटल | किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | गूळ | ६,२८,१२२ | ६,२८,१२२ | ७०,६८,२५,४८५ |
| २ | शेंग | ८६६ | ८६६ | १४,५४,५३२ |
| ३ | कांदा | ९,३१,४८९ | ९,३१,४८९ | २५,८६,७०,०६० |
| ४ | बटाटा | २,६१,०८४ | २,६१,०८४ | १२,०२,३७,३५० |
| ५ | लसूण | ८,६७५ | ८,६७५ | १,५९,१७,६५० |
| ६ | भाजीपाला | ५,४९,७८२ | ५,४९,७८२ | २७,८३,८३,१६५ |
| ७ | फळे | १,३५,०५२ | १,३५,०५२ | १८,४५,९१,४०४ |
| ८ | धान्ये व कडधान्ये | ७,२२,८७८ | ७,२२,८७८ | १,०५,८५,५१,३१० |
| | | | एकूणउलाढाल रुपये | २,६२,४६,३०,९५६ |

संदर्भ : सांख्यिकी विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

सन २००२-२००३ मधील बाजार आवारातील शेतमालाची आवक, विक्री व किंमत यांचा तक्ता पाहिल्यास असे दिसून येते की, सर्वाधिक आवक विक्रीची किंमत धान्य, कडधान्य, या उत्पादनाची आहे. त्या खालोखाल गूळ व भाजीपाला आवक विक्री किंमत आहे. सर्वसाधारणपणे एकूण वार्षिक उलाढाल रु. २,६२,४६,३०,९५६/- इतकी आहे.

## बाजार समितीचे उत्पन्न व खर्चाच्या बाबी :

### बाजार फी :

समितीचे मुख्य उत्पन्न 'बाजार फी' आहे. बाजार फी रु. १ ही प्रती १००/- रुपये या दराने घेण्यात येते. सन २००२-२००३ या वर्षात समितीस बाजार फी रु. ३,१४,११,१५५/- इतकी मिळाली आहे. समितीचे फळे भाजीपाला विभागाकडील बाजार फी दररोज व्यापाऱ्यांकडून वसूल केली जाते. त्यामुळे समितीच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे.

### अनुज्ञप्ती फी :

मुख्य किंवा दुय्यम बाजार क्षेत्रात शेती उत्पन्नाचा खरेदी विक्री व्यवहार करण्यासाठी समितीकडून परवाना घ्यावा लागतो. त्यासाठी ही वार्षिक फी आकारणी केली जाते.

### सुपरव्हिजन कॉस्ट :

अधिनियमातील तरतूदीनुसार सुपरव्हिजन कॉस्ट ०.०५ पैसे ही प्रती १००/- रुपये दराने घेऊन ती ट्रेझरीत भरणा केली जाते.

### बाजार आकार :

बाजारपेठेवर शेतीमाल विक्रीस आणणाऱ्या शेतकऱ्यांना अडत, तोलाई, हमाली, लेव्ही असे बाजार आकार द्यावे लागतात. बाजारपेठेमध्ये बाजार आकार उपविधी अन्वये ठरविले जातात. बाजार आकार वाजवी असल्याने शेतकऱ्यांना विक्री खर्च कमी येतो.

### उत्पन्न व खर्च :

समितिच्या मार्केट फी, अनुज्ञपी, मिळालेले व्याज, इमारत भाडे, किरकोळ उत्पन्न या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी आहेत. सदस्य भत्ते, नोकर पगार, पाणी, विज व टेलीफोन बिले, म्युनिसिपल कर, सभा व समारंभ खर्च या समितीच्या खर्चाच्या बाजू आहेत.

बाजार समिती ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक राहणाऱ्या रक्कमेस वाढावा असे म्हणतात. बाजार समितीच्या उत्पन्नात सातत्याने वाढ झालेली

दिसते. तसेच त्या प्रमाणात खर्चातही वाढ झाली आहे. तरीही बाजार समितीच्या प्रशासनाने वाढावा रक्कम ठेवली आहे. हे पुढील तक्त्यावरून दिसून येते.

**तक्ता क्र. ३**

**बाजार समितीचे उत्पन्न खर्च व वाढावा यांचा तुलनात्मक तक्ता**

| वर्ष | एकूण उत्पन्न रुपये | एकूण खर्च रुपये | वाढावा रुपये |
|---|---|---|---|
| १९९१-१९९२ | १,०९,२१,४१० | ७१,७६,१५८ | ३७,४५,२५२ |
| १९९२-१९९३ | १,३२,७०,८०२ | ८३,५१,९२४ | ४९,१८,८७८ |
| १९९३-१९९४ | १,५९,०१,४२५ | १,०७,४०,२५८ | ५१,६१,१६६ |
| १९९४-१९९५ | १,६१,२९,७९१ | १,०५,०१,७३२ | ५६,२८,०५९ |
| १९९५-१९९६ | १,९३,३५,००८ | १,२४,५२,२६९ | ६८,८२,७३९ |
| १९९६-१९९७ | १,९७,७१,२४६ | १,३२,५५,८०२ | ६५,१५,४४४ |
| १९९७-१९९८ | २,२१,४७,३५८ | १,४९,०१,९९४ | ७२,४५,३६४ |
| १९९८-१९९९ | २,३९,४७,९७४ | १,८८,९९,५२२ | ५०,४८,४५२ |
| १९९९-२००० | २,५१,४७,०११ | २,३१,३२,५५३ | २०,१४,४५८ |
| २०००-२००१ | २,८२,७४,००१ | २,१२,२१,११७ | ७२,५२,८८४ |
| २००१-२००२ | ३,१५,५६,८४७ | २,८३,९९,५९७ | ३१,५७,९५० |
| २००२-२००३ | ३,१४,११,१५५ | २,९९,८१,८५९ | १४,२९,२९६ |

संदर्भ : सांख्यिकी विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर

सन १९९१-१९९२ ते २००२-२००३ या १२ वर्षातील उत्पन्न व खर्चाचा तक्ता पाहिल्यास असे दिसून येते की, बाजार समितीच्या उत्पन्न व खर्चात सातत्याने वाढ झालेली दिसून येते. तसेच वाढावा रक्कमही नियमित राहिली आहे.

कोल्हापूर बाजार समिती ही जिल्हातील प्रमुख बाजार समिती आहे. या बाजारपेठेस राजर्षि शाहूंचा ऐतिहासिक वारसा आहे. बाजार समितीचे उत्पन्न एक कोटीच्या वर असलेने या बाजार समितीचा महाराष्ट्रातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये (अ वर्ग) समावेश होतो. बाजार समिती सतत प्रगतीकडे वाटचाल करत असून समितीने अद्ययावत धान्य मार्केट प्रकल्प उभारणीचे काम चालू केले आहे.

कोल्हापूर बाजार समिती गूळाची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. सुमारे ११० वर्षापूर्वी राजर्षि शाहूंनी ही गूळाची बाजारपेठ स्थापन केली होती. त्याकाळापासून आजपर्यंत या बाजारपेठेने गूळाच्या व्यापारात देशात व परदेशात आपली ख्याती वाढविली आहे. बाजार समितीच्या एकंदरीत कामकाजपद्धीमुळे या बाजारपेठेत महाराष्ट्र, कर्नाटक तसेच देशाच्या इतर प्रदेशातूनही शेतीमालाची आवक होते. बाजार समितीने शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे.

# संदर्भ सूची

१) प्रा. जगदीश किल्लोळ, पृष्ठाधार साहित्य, धनंजयराव गाडगीळ सहकारी संस्था, नागपूर, मार्च २००२. पृष्ठ क्र. ४७,४८

२) प्रशिक्षण विभाग, Course Material Market Secretaries Training Programme, Government of India, Ministry of Rural Development of Marketing and Inspection Branch, Head Office Nagpur, पृष्ठ क्र. ४०,४१.

३) तत्रैव

४) तत्रैव

५) प्रा. जगदीश किल्लोळ, तत्रैव, पृ. ५२

६) तत्रैव

७) प्रशिक्षण विभाग, तत्रैव, पृ. क्र. ४१

८) Patil S. H., A Study of Regulated Market : A Case of Shahu Market Yard, Kolhapur, Shivaji University, Kolhapur. M.Phil Dissertation, May 1989. पृ. क्र. ११

९) व. श. जोशी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७, न्यायदिप प्रकाशन पुणे, २००३, पृ. क्र. १२

१०) डॉ. आर. एम. खर्चे, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, कार्यक्रम, प्रकल्प आणि योजना, पृष्ठ क्र. २

११) पाटील रा. स., 'सोनियाच्या पाऊलांनी', रौप्य महोत्सव ग्रंथ, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, १९७०, पृ. क्र. ६५

१२) दादोबा चौगले, 'कोल्हापूरची किर्ती दिगंत करणारी गूळ व्यापार पेठ' रौप्य महोत्सव ग्रंथ, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, १९७०, पृ. क्र. २४

१३) पाटील रा. स., तत्रैव, पृष्ठ क्र. ६५

१४) पाटील रा. स., तत्रैव, पृष्ठ क्र. ६६

१५) दादोबा चौगले, तत्रैव, पृष्ठ क्र. २३

१६) पाटील रा. स., तत्रैव, पृष्ठ क्र. ६३

१७) पाटील रा. स., तत्रैव, पृष्ठ क्र. ६४

१८) पाटील रा. स., तत्रैव, पृष्ठ क्र. ६४

१९) पाटील रा. स., तत्रैव, पृष्ठ क्र. ६४

२०) दादोबा चौगले, तत्रैव, पृष्ठ क्र. २४

२१) सचिव, सर्वसाधारण माहितीचा अहवाल, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, पृष्ठ क्र. ३

२२) सचिव, तत्रैव, पृष्ठ. क्र. ९,१०

२३) सचिव, तत्रैव, पृष्ठ. क्र. ५

२४) सचिव, तत्रैव, पृष्ठ. क्र. २

२५) सचिव, तत्रैव, पृष्ठ. क्र. ५